लोकमत
कोल्हापूर, रविवार, दि. १ जून २०२५

# अकरावीला बायोमेट्रिक हजेरी, रोज कॉलेजला जावेच लागणार


## शिक्षण विभागाचा निर्णय : अकॅडमीत क्लास लावणाऱ्यांना लागणार चाप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊन अकरावी, बारावीसाठी अकॅडमीत क्लास लावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी, महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या जास्त असली तरी वर्गात मात्र, हाताच्या बोटावर मोजण्याइतपतच विद्यार्थी असतात. हे चित्र सर्व राज्यभर आहे.

त्यामुळे शिक्षण विभागाच्यावतीने अकरावीत बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती वाढवणे, तसेच शिष्यवृत्ती आणि सवलतींसाठी पारदर्शकता आणणे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय स्तुत्य असला तरी महाविद्यालयांत प्रवेश घेऊन क्लासेस करणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण होणार आहे.

### कोणत्या शाखेच्या किती?






### अकरावीची प्रवेश प्रक्रिया कशी राबविणार?

सध्या अकरावीची राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेसाठी २८५ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यात ६६ हजार १० इतक्या जागा असून येत्या ३ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे.

### जिल्ह्यात अकरावीच्या ६६ हजार जागा

यंदा कोल्हापूर जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेत ५२ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर अकरावीसाठी ६६ हजार १० जागांची प्रवेश क्षमता आहे. मात्र, आयटीआय, पॉलिटेक्निकसह इतर विविध अभ्यासक्रमांसाठीही विद्यार्थी प्रवेश घेतात.

> **सरकारने विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेली बायोमेट्रिक हजेरी पद्धत अतिशय चांगली आहे. मात्र, अकॅडमीचे जे पीक फोफावले आहे, त्यावर कडक निर्बंध लावायला हवेत. सरकारने अकॅडमींवर जर कडक कारवाईचे धोरण अवलंबले तर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या निश्चित वाढेल.**
>
> **डॉ. आर. आर. कुंभार**, प्राचार्य विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर.



### अकरावीच्या विद्यार्थ्यांना थम्ब अटेंडन्स बंधनकारक

कोचिंग क्लासच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक असेल. या निर्णयामुळे आता विद्यार्थ्यांना वर्षभरात किमान ७५ टक्के उपस्थिती नोंदवणे गरजेचे आहे.

A